नाटक | नाट्यस्पर्धा : 'प्रवरा थिएटर्स'च्या नाटकाने समजावले सवंग राजकारणाचे दुष्परिणाम

# विद्यमान राजकारणावरील भाष्य करणारे 'उत्खनन'

'इतिहासातून प्रेरणा मिळते, तशीच निराशा अन क्रूरताही', हा विचार मांडणारे नाटक प्रवरा थिएटर्स आणि एफ. के. क्रिएशन्स (शेवगाव) यांनी राज्य नाट्य स्पर्धेत सादर केले.

फाळणी, गांधी हत्या, आणीबाणी, बाबरी प्रकरण, मंदिर आंदोलन, मुंबई बॉम्बस्फोट, गोध्रा हत्याकांड अशा अनेक प्रसंगातून इतिहासाची नकारात्मक मुडदे उकरणे व त्याचे राजकारण करणे यावर भाष्य करणारे इरफान मुजावर लिखित व प्रा. फिरोज काझी दिग्दर्शित 'उत्खनन' या नाटकातुन ग्रामीण कलाकारांनी राजकीय सद्यस्थितीवर नेमके बोट ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

फक्त तीन कलाकारांनी आपल्या प्रतिभेने दोन्ही अंकात प्रेक्षकांच्या टाळ्या मिळवल्या. पडदा उघडताच दृष्टीक्षेपात पडतात अनेक फायलीचे गठ्ठे, बॉक्स, काळे-पांढरे फुगे तसेच 'नॉट एंट्री' नावाचा बोर्डही. सध्याच्या राजकीय परिस्थितीत जात-धर्म, भेदभाव, दंगली, आरक्षण यासह फाळणी आणि स्वातंत्र्य युद्धातील काही मुद्यांसह इंदिरा व राजीव गांधी हत्या आणि गोध्रा कांडच्या फायलीतून नाटक सुरू होते.

राजकीय व्यंगावर भाष्य करत असतानाच एक कार्यकर्ता एलियन स्टाईलने प्रकटतो. नेपथ्य प्राचार्य डॉ. ओंकार रसाळ, प्रा. अजित भालसिंग, प्रा. डॉ. सुरेश नजन, डॉ. राहुल पांडव, प्रा. राहुल खरात, प्रा. रामचंद्र छडीदार, मोनिका सावंत, प्रकाशयोजना प्रा. वाल्मिक जाधव व विनोद राठोड, संगीत डॉ. तुकाराम देवकर व प्रा. पांडुरंग शिनगारे, रंगभूषा प्रा. केशव ससे व मन्मथ क्षीरसागर, वेशभूषा प्रा. सुमित पूलाटे व प्रा. चैतन्य गंगावणे यांनी आपापली कामे नीट पार पाडली.



## 'भारतीयता हाच धर्म' असा विचार देण्याचा प्रयत्न

- इतिहासाच्या पोतडीतून निराशादर्शक मुद्दे पुढे आणून भारतात विखारी आणि धर्मांध राजकारण कसे पोसले जाते. सामान्यांच्या मूलभूत गरजा कशा मागे पडतात आदींवर हे नाटक बोट ठेवते. सामान्यांना भुलवणारे राजकारण केल्याने देश संपण्याची भीती आहे.
- अशावेळी राजकीय पुढारी कसे घर भरतात आणि सामाजिक भेदभाव वाढवण्यासाठी बहुजनांचा वापर करतात या मुद्द्यांना प्रेक्षागृहातून टाळ्यांची दाद मिळते.
- भारतीयता हाच धर्म असा विचार देऊन नाटकाचा पडदा पडतो.

## पटेल, नवघरेंनी रंग भरला

- राजकीय नाटकात समतोल ठेऊन मांडणी करणे मोठे अवघड. मात्र, 'उत्खनन'च्या टीमने ते लिलया पेलली.
- काही ठिकाणी संवादातील अडखळणे आणि 'नॉट एंट्री' वगळता नाटक प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेते.
- वास्तवाचे भान करून देणारा हिस्ट्री स्टोअर रूमचा व्यवस्थापक प्रा. फिरोज काझी यांनी उत्तम साकारला. प्रा. साजेद पटेल यांनी युवा राजकारणी आणि दादा नवघरे यांनी सामान्य नागरिकाच्या भूमिकेत रंग भरला.

नगर टाइम्स
अहिल्यानगर । शनिवार, २२ नोव्हेंबर २०२५

# राजकीय व्यवस्थेवर सणसणीत भाष्य करणारे उत्खनन

**आजकालची राजकीय व्यवस्था कमालीची गढूळ झाली आहे. सामान्य नागरिकांच्या मूलभूत सोयी-सुविधांकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जाते. निवडणुकीत जिंकण्यासाठी स्फोटक व विध्वंसक घटनांच्या कुबड्यांचा आधार घेतला जातो. इतिहास विसरणे योग्य नाहीच. मात्र या भुतकाळातील घटनांचा वापर जखमांवरील खपल्या काढण्यासाठी नाही तर भविष्यातील चुका टाळण्यासाठी व्हायला हवा, अन्यथा देश विनाशाकडे जाईल. त्यात सामान्य जनतेची फरपट होईल, असा सणसणीत संदेश देणारं 'उत्खनन' हे नाटक राज्य नाट्य स्पर्धेत शुक्रवारी (२१ नोव्हेंबर) रंगमंचावर सादर झालं. राजकीय व्यवस्था, शिक्षण, ऐतिहासिक संदर्भावर नेमकेपणाने बोट ठेवून विषय स्पष्टपणे मांडून नाटकाने प्रेक्षकांची वाहवा मिळविली.**

---

शेवगाव येथील प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या प्रवरा थिएटर्स व एफ. के. क्रिएटिव्ह क्रिएशन्सने सादर केलेल्या उत्खनन या नाटकाचे लेखक इरफान मुजावर आहेत. प्रा. डॉ. फिरोझ काझी यांनी त्याचे दिग्दर्शन केले. राजकीय नेते व कार्यकर्त्यांची मानसिकता आणि बरबरटलेली व्यवस्था यांच्यावर सरळ भाष्य करून त्याचे उत्कृष्टपणे सादरीकरण करण्यात दिग्दर्शक प्रा. फिरोझ काझी यशस्वी झाले. विविध प्रसंगांत नाटकाने चांगला संदेश दिला. इतिहासाचे उत्खनन करू नका, जर करायचेच असेल तर त्यातील घटनांचा बोध घेऊन भविष्यातील चुका सुधारा. त्याचा गैरवापर देशाला घातक ठरेल, असा इशारावजा सल्ला नाटकाने अधोरेखित केला. कलाकारांचा आत्मविश्वासू अभिनय, तांत्रिक बाजूंची योग्य साथ यामुळे नाटक खुलले.

पहिल्या अंकाच्या सुरुवातीलच जुनाट साहित्य असलेल्या भांडाराचे दर्शन होते. जातीयवाद, भेदभाव, संविधान, गोध्रा कांड, इंदिरा गांधी हत्याकांड, राजीव गांधी हत्या, धर्मवाद, आरक्षण, धार्मिक प्रश्न आदी फलक असलेल्या वस्तू तेथे दिसतात. अर्थात ते असते निवडणुकीसाठी हव्या असलेल्या स्फोटक मुद्द्यांचे ऐतिहासिक भांडार! या भांडारात एक राजकीय कार्यकर्ता येतो. त्याला निवडणुकीसाठी मुद्दे हवे असतात. मात्र, त्या नवख्या कार्यकर्त्याला हवे असलेले साहित्य निष्फळ असल्याचे भांडाराचा संचालक सांगतो. झोपडपट्टी विकास, रस्ते, पाणी, वीज या प्रश्नांवर निवडणूक लढविण्यापेक्षा राजकीय लोक स्फोटक व विध्वंसक घटना उगाळून त्याचा वापर करतात, या राजकीय वृत्तीवर तो प्रखरपणे भाष्य करतो.

भांडारात असलेल्या अंधारी खोलीबाबत कार्यकर्ता विचारतो तेव्हा त्याला ते इतिहासाचे गर्भगृह असून तेथे उत्खनन करावे लागते, मगच ऐतिहासिक गोष्टींचे दर्शन होते. असं भांडार संचालक सांगतो. तो तेथे उत्खनन करतो. त्यात कार्यकर्त्याला देशाची फाळणी, आणीबाणी, खालिस्तानी कारवाई, इंदिरा गांधी हत्या, कारसेवा, गोध्राकांड, मुंबई बॉम्बस्फोट आदी घटना दिसतात. या घटना दर्शविण्यासाठी नाटक फ्लॅशबॅकमध्ये जाते. प्रत्येक प्रसंगांत सामान्य माणसाची होणारी अवस्था बिकट होते.

अशा ऐतिहासिक घटनांच्या संदर्भाचा वापर राजकीय व्यक्ती स्वार्थासाठी करतात. सत्तेपुढे ते कोणत्याही थराला जातात. मानसिक गुलामगिरी वाढली की देश विनाशाकडे जातो हा विचार समजावून सांगण्यासाठी 'जालियनवाला बाग हत्याकांडा'चे उदाहरण नाटकात दिले आहे. जनरल डायरच्या आदेशावरून सैनिक असलेल्या भारतीयांनीच भारतीयांवर गोळ्या झाडल्या. ते सैनिक मानसिक गुलाम असतात, असे त्या प्रसंगात सांगितले जाते. सामान्य माणसांकडे कुणाचेच लक्ष नसते. त्याची कायम बोळवणच होते. त्यांचा वापर केवळ मतांसाठीच होतो. नेत्याच्या दवाबाखाली चुकीचे कृत्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची झालेली हतबलताही नाटकात दाखविण्यात आली आहे. शेवटच्या प्रसंगांत डोळे उघडलेल्या कार्यकर्त्याला भांडारचा संचालक एक कोरे पुस्तक देऊन त्यात नवीन सकारात्मक विचार मांडायला सांगतो. सामान्य माणूस आणि कार्यकर्ता जातो, मग पुन्हा नवा कार्यकर्ता मुद्दे घ्यायला तेथे येतो आणि हे चक्र पुन्हा सुरू होते अशा दृश्याने नाटक संपते.

बरबरटलेल्या राजकीय स्थिती दर्शविणारी नाटकाची संहिता दमदार होती. त्याला दिग्दर्शक फिरोज काझी यांनी उत्तमपणे रंगमंचावर उतरविले. तीनच पात्र असूनही नाटक रेंगाळले नाही. नाटकाने दिलेला स्पष्ट संदेश प्रेक्षकांना भावला पण काही गंभीर प्रश्नांचा विचारही करायला लावले.







संदीप जाधव
९२२५३२०९४६

मुख्य नायकाच्या भूमिकेत असलेल्या प्रा. फिरोझ काझी यांच्याकडे सर्वांत जास्त जबाबदारी होती. आत्मविश्वासू अभिनय आणि विविध हावभाव यांना त्यांच्या सकारात्मक देहबोलीची साथ मिळाली. चिंतातूर, व्याकूळ व निग्रही हावभावांनी त्यांचे पात्र खुलवले. पाठांतरही चांगले होते. दोन-तीन वेळा शब्दांत ते अडखळले. मात्र, विविध प्रसंगांत त्यांनी केलेला अभिनय लाजवाबच होता. आवाजातील चढ-उतारही उत्तम होती.

प्रा. साजेद पटेल यांनी राजकीय कार्यकर्त्याची भूमिका व्यवस्थित वठवली. अभिनयाकडे त्यांनी चांगले लक्ष दिले. संवादही चांगले रंगवले. पण दोनदा ते अडखळले. उत्खनन करतानाचे हावभाव विशेष आवडले.

दादा नवघरे यांनी सामान्य माणसाला रंगमंचावर आणले. त्यांनीही आपल्या भूमिकेला न्याय दिला. मार्मिक भाष्य करून त्यांनी प्रेक्षकांना विचारात पाडले. सर्वांत कमी संवाद त्यांच्या वाट्याला आले. मात्र पात्राला त्यांनी गंभीरपणे उभे केले.

नाटकाचे सूत्रधार प्राचार्य डॉ. ओंकार रसाळ होते, तर प्रवरा शैक्षणिक संकुलाच्या सहसचिव मोनिकाताई सावंत यांची निर्मिती होती.

इतिहास भांडाराचे नेपथ्य उत्तम वाटले. ही जबाबदारी प्राचार्य डॉ. ओंकार रसाळ, प्रा. अजित भालसिंग, प्रा. डॉ. सुरेश नजन, डॉ. राहुल पांडव, प्रा. राहुल खरात, प्रा. रामचंद्र छडीदार यांच्याकडे होती. नाटकातील प्रसंग उठावदार करणारी प्रकाश योजना प्रा. वाल्मिक जाधव व विनोद राठोड यांनी सांभाळली. विविध स्पॉट त्यांनी योग्यपणे दिले. रक्तरंजित प्रसंगावेळी लाल लाईट्सचा कल्पकतेने वापर केला. एक-दोन प्रसंगांत लाईटची गफलत झाली. मात्र, प्रसंग प्रभावी करण्यात प्रकाश योजना सहाय्यभूत ठरली. नाटकात अनेक प्रसंगांत संगीताचा वापर नेमकेपणाने करण्यात आला. नेहरू, इंदिरा गांधी यांची भाषणे, तसेच प्रसंगानुरूप दिलेले पार्श्वसंगीत आवडले. ही जबाबदारी डॉ. तुकाराम देवकर व प्रा. पांडुरंग शिनगारे यांनी सांभाळली. रंगभूषा प्रा. केशव ससे व प्रा. मन्मथ क्षीरसागर यांच्याकडे होती. सर्वच पात्रांची रंगभूषा उत्तम होती. वेशभूषा प्रा. सुमित पुलाटे, प्रा. चैतन्य गंगावणे यांनी केली. कार्यकर्त्याच्या टोपी, मुस्लीम पेहराव, तसेच सामान्य माणसाची वेशभूषाही समर्पक वाटली. गौरव क्षीरसागर, विजय गाढे, तृणाल दौंड, अमन पठाण, त्रिपुल शिंदे, अजिंक्य भुजबळ यांचेही नाटकासाठी सहकार्य लाभले.

राजकीय व्यवस्थेवर थेट भाष्य करणारे हे नाटक दिग्दर्शक प्रा. फिरोझ काझी यांनी रंगमंचावर ठसठशीतपणे उतरवले. काही तांत्रिक चुका झाल्या असल्या तरी नाटकाचा संदेश प्रेक्षकांपर्यंत स्पष्टपणे पोहोचला. दिग्दर्शनाबरोबरच मुख्य नायकाची भूमिका काझी यांनी व्यवस्थित पेलली. राजकीय वृत्तीवर आधारित असणाऱ्या या नाटकाने अनेक विचारही मांडले, ते प्रेक्षकांना भावले.

# उत्खनन : एक राजकीय व्यंगनाट्याचा ठसा

■ निरंजन केसकर

**इरफान मुजावर लिखित आणि फिरोज काझी दिग्दर्शित 'उत्खनन' हे नाटक आजच्या राजकीय वास्तवावर तीक्ष्ण प्रकाश टाकतं. प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या 'प्रवरा थिएटर्स' आणि एफ. के. क्रिएटिव्ह क्रिएशन्स, शेवगाव यांनी सादर केलेल्या या दोन अंकी नाटकात सूत्रधार म्हणून प्राचार्य डॉ. ओंकार रसाळ यांनी भूमिका साकारली. याशिवाय, प्रा. फिरोज काझी, प्रा. साजेद पटेल आणि दादा नवघरे यांनी साकारलेली पात्रंही प्रेक्षकांना अस्वस्थ करतात.**

कथा एका उत्साही तरुण कार्यकर्त्यावर केंद्रित आहे. देशासाठी काहीतरी करावं, बदल घडवावा या भावनेतून तो पक्षात प्रवेश करतो. निवडणुकीसाठी योग्य 'कंटेंट' शोधण्याच्या कामगिरीवर त्याला पाठवले जाते आणि त्यासाठी तो पोहोचतो इतिहासाच्या प्रतीकात्मक 'स्टोअर रूम'मध्ये- एक अशी जागा जिथे भूतकाळ जिवंत होतो.

तरुण कार्यकर्ता जेव्हा या 'NOT ENTRY' असलेल्या बंद रूमकडे जातो, तेव्हा त्याला ग्रंथपाल वारंवार सावध करतो. पण कार्यकर्त्याच्या मनात एक जिद्द आहे. देशासाठी काहीतरी शोधण्याच्या, काहीतरी 'महत्त्वाचं' सापडण्याच्या उत्कटतेने तो रूमचा दरवाजा ढकलून आत प्रवेश करतो.

या प्रतिबंधित खोलीत पाऊल टाकताच भूतकाळ जिवंत होऊ लागतो. इतिहासातील जखमांनी भरलेल्या घटना-भारत-पाक फाळणी, महात्मा गांधी हत्या, आपत्काल, ऑपरेशन ब्ल्यू स्टार, १९८४ दंगल, बाबरी मशीद पाडणे, मुंबई बॉम्बस्फोट, २००२ दंगल केवळ त्याच्या समोर दृश्य म्हणून उभ्या रहात नाहीत; त्या खोलीच्या भिंतीवरून, हवेतून, आवाजांतून त्याला भिडतात. प्रकाश योजनेतील चमक, अंधार, लालसर छटा या सर्व घटनांना भेदक जिवंतपणा देतात.

नाटकाचा राजकीय उपरोध ठिकठिकाणी धारदार दिसतो. "मी मित्र म्हटलं, 'मित्रों' नाही" यांसारख्या संवादांनी पात्रांची मानसिकता, त्यांचे विडंबनात्मक स्वर आणि आपल्या सार्वजनिक भाषण संस्कृतीतले बदल अधोरेखित होतात. या उपरोधिक क्षणांमुळे गंभीर कथेमध्ये विशिष्ट लय निर्माण होते.

युवकाला सुरुवातीला वाटतं की इतिहासाचा वापर निवडणुकांसाठी करता येईल, पण जसजसं उत्खनन सुरू होतं-भूतकाळाच्या जखमांचा भार त्यालाही जाणवू लागतो.




कथेचा सर्वात महत्त्वाचा बिंदू म्हणजे तरुण कार्यकर्त्यामध्ये घडणारा अंतर्मुख बदल. तो राजकीय घोषणांनी, विचारसरणीच्या डोहात बुडालेल्या भाषणांनी किंवा वादविवादांनी होत नाही-तो घडतो एका साध्या, अगदी घरगुती क्षणी. त्याचा फोन वाजतो. कॉलवर त्याची छोटी मुलगी असते. अर्धी रडलेली, घाबरलेली. तो सुरुवातीला तिला हलक्या फुलक्या आवाजात समजावतो- "अगं, रडू नको... मी आलो की आपण आईकडे बघूया... ठीक?"

अचानक तो स्तब्ध होतो. फोनच्या टोकाला काहीच आवाज येत नाही. पण त्या शांततेतही जाणवतं- ती त्याच्याशी 'I love you' असंच काहीतरी म्हणाली असणार.

इतिहासातील हिंस्र घटना, राजकीय घोषणाबाजी, ध्वज आणि घोषवाक्यांच्या मागची धडपड- या सगळ्यापेक्षा आपलं घर, आपली माणसं, आपली मुलं कितीतरी महत्त्वाची आहेत, हे त्याला पहिल्यांदाच अगदी ठसठसून जाणवतं. त्याचा आवाज बसतो, हात थरथरतो आणि खोलीतल्या असंख्य ऐतिहासिक जखमांच्या साक्षीने तो हळूच म्हणतो, "I love you." हा क्षण म्हणजे त्याचा खरा 'उत्खनन'. इतिहासाचा नव्हे, स्वतःच्या मनाचा आणि याच क्षणी तो हा राजकीय खेळ सोडण्याचा निर्णय घेतो.

"आत्मा गुलाम झाला की देश गुलाम होतो", "इतिहास उगाळायचा नसतो-जपायचा असतो" हे संदेश मनाला भिडतात. नाटकाच्या शेवटी ग्रंथपाल त्याच्या हातात एक कोरं, अगदी रिकामं पुस्तक ठेवतो. या साध्या कृतीतून इतिहासाच्या वजनाखाली दडून न जाता, स्वतःची नवी वाट शोधतो, तरीही शेवटच्या क्षणी पुन्हा एकदा 'नव्या' राजकीय चेहऱ्याचे आगमन दाखवत नाटक वर्तमान राजकारणाच्या भाष्य करत.

नाटकातील सर्वात ठळक जाणवणारी गोष्ट म्हणजे काही दृश्यांमध्ये दिसणारी 'ताणणी'. अनेक घटनांचे मॉंताज विविध संदर्भांसह उलगडत जातात, सुरुवातीला ते प्रभावी भासतात, पण पुढे जाऊन त्यांच्या एकसुरीपणाची चाहूल लागते. प्रेक्षकांना त्या घटनांविषयी आधीच जाण असल्यामुळे दृश्यात्मक पुनरावर्तन थोडं जाणवत राहतं. चर्चात्मक संवादांची पुनरावृत्तीही कधी कधी जास्त जाणवते. अर्थात, प्रेक्षकांना माहिती असलेल्या गोष्टी पुन्हा सांगणं चुकीचं नाही; पण त्यांचा परिणाम तितका भेदक होत नाही. उलट त्या खोलीत प्रत्यक्षात काय घडतंय-जिथे एक माणूस आपल्या इतिहासाच्या भीतीतून बाहेर पडण्याचा मार्ग शोधतो-ते अधिक महत्त्वाचं आणि प्रभावी वाटतं.



राज्य नाट्य स्पर्धेत सादर झालेल्या 'उत्खनन' नाटकातील प्रसंग (छायाचित्र : सागर इंगळे)

प्रकाश योजना (प्रा. वाल्मीक जाधव, श्री. विनोद राठोड) नाटकाच्या मागणीला साजेशी. ना जास्त, ना कमी. संगीत (डॉ. तुकाराम देवकर, प्रा. पांडुरंग शिनगारे) जुन्या राज्य नाट्य परंपरेतून उचलल्यासारखं वाटतं. ओळखीचं, अनेक वेळा ऐकलेलं. रंगभूषा व वेशभूषा (प्रा. केशव ससे, प्रा. मन्मथ क्षीरसागर – रंगभूषा) (प्रा. सुमीत पुलाटे, प्रा. चैतन्य गंगावणे – वेशभूषा) प्रभावी. छोट्या-छोट्या प्रॉप्सनी- पगडी, शाल, मोदी जॅकेट यामुळे पात्रांची ओळख आणि काळ थोडक्यात, स्पष्टपणे उलगडला.

नेपथ्य : (प्राचार्य डॉ. ओंकार रसाळ, प्रा. भालसिंग अजित, प्रा. डॉ. सुरेश नजन, डॉ. राहुल पांडव, प्रा. राहुल खरात, प्रा. रामचंद्र छडीदार) नेपथ्यात गांधी, आंबेडकर यांच्या प्रतिमा ठळकपणे दिसतात. इतिहासाच्या भाराचं आणि संदर्भाचं प्रतीक म्हणून. त्यासोबत जातीयवाद, धर्मवाद, संविधान, भेदभाव अशा आशयांचे पट्टे-डब्बे खोलीत ठेवलेले दिसतात; या सर्व वस्तूंनी ती जागा केवळ स्टोअर रूम न राहता एक विचारांचं संग्रहालय बनवली.

एकूणच "उत्खनन" हे नाटक इतिहासाच्या वापरावर तीव्र भाष्य करतं - कारण इतिहास जगासमोर येण्यात काहीच समस्या नाही, पण तो कोणत्या नजरेतून आणि कोणत्या हेतूने पुढे आणला जातो, हेच खरं महत्त्वाचं ठरतं.